# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०४/०६/२०२६ (गुरूवार )

---

## पोलीस स्टेशन कन्हान अप क्रमांक ३७९/२०२६ या गुन्हयाबाबत सविस्तर माहीती...

सदर प्रकरणातील पिडीतेच्या तक्रारीवरून कोलकाता येथील डमडम पोलीस स्टेशन येथे झिरो एफआयआर नोंदविण्यात आला. दिनांक २८/०५/२०२६ रोजी सदर झिरो एफआयआर प्राप्त होताच पोलीस स्टेशन कन्हान येथे अप क्रमांक ३७९/२०२६ कलम ७४, १०९, ११५ (२) २९९, ३५१(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. प्राप्त तक्रारीनुसार, पिडीत फिर्यादी महिला एप्रील २०२६ मध्ये गाडेघाट, जुनी कामठी येथील हुजूर मरियम अम्मा दरगाह येथे आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी आली होती. या कालावधीत आरोपींनी संगनमताने तिचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला तसेच विनयभंग करून तिला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता अशी माहीती प्राप्त झाली.

सदर गुन्हयाचे गांभीर्य तसेच संवेदनशीलता लक्षात घेता मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात तात्काळ पोलीस तपास पथक दिनांक २९/०५/२०२६ रोजी सकाळी विमानाने कोलकाता येथे रवाना झाले. तपास पथाकाने फिर्यादीचे सविस्तर बयान आणि तिच्या आई वडीलांचे सविस्तर बयान नोंदविले. त्याच दिवशी संध्याकाळी मुख्य आरोपी क्रं १) ताजी तनविरुददीन कलीमउददीम, वय ५२ वर्षे, रा. अम्मा दर्गा, गाडेघाट, कन्हान,२) ताजीन मुस्ताफिजुददीन तनविरुददीन, वय २४ वर्षे, रा. अम्मा दर्गा ,गाडेघाट, कन्हान आणि ३) तेजस आनंद खोब्रागडे, वय २४ वर्षे, रा. न्यु खलासी लाईन, कामठी यांना अटक करण्यात आली. सदर प्रकरणाशी संबंधित तांत्रिक पुरावे वैज्ञानिक तपासणीसाठी न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेत (FSL) पाठविण्यात आले आहेत.

**सदर प्रकरणाचा निष्पक्ष, सखोल व प्रभावी तपास करण्यासाठी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय विशेष तपास पथक गठित करण्यात आले असून त्यामार्फत तपास सुरू आहे. तसेच स्थानिक स्तरावर विशेष तपास पथकाचे अधिकारी यांचा संपर्क क्रमांक प्रसारित करण्यात आला आहे. या प्रकरणासंदर्भात कोणाकडेही कोणतीही माहिती, तक्रार अथवा पुरावा असल्यास त्यांनी पोलीस प्रशासनाने उपलब्ध करून दिलेल्या संपर्क क्रमांकावर माहिती देण्याचे आवाहन करण्यात येत आहे.**

**संपर्क क्रमांक**

**१) श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण – 9011911799**

**२)श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग – 8308195933**

## केळवद अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) प्रकरणात आणखी १ आरोपी अटकेत
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** – दिनांक ०२/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केळवद टोल नाका येथे सापळा रचुन आरोपी क्रं १) गोविंद नन्नीलाल पाल, वय ३९ वर्ष ,रा. हरसुल, जि. होशंगाबाद, राज्य मध्य प्रदेश ह.मु. सौंसर, जि पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश, याच्यासह आरोपी क्रं २) लालताप्रसाद शंभूप्रसाद पटेल, वय ५३ वर्ष, रा.परसिद्धी, करवली खुर्द, जि. सिद्धी, राज्य मध्य प्रदेश,३) दीपक धनराज देठे, वय ३३ वर्ष, रा. सौंसर, जि पांढुर्णा, राज्य मध्य प्रदेश यांना अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर सह पकडले होते. सदर प्रकरणी पोलीसांनी १) एम.डी (मेफेड्रोन पावडर) वजन ४८५ ग्रॅम किंमती २४,२५,०००/–रूपये, २) महिंद्रा स्कार्पियो क्रमांक एम पी ०४ झेड एक्स ५४९३, ३) एक आय फोन, आणि ४) दोन ॲड्रॉईड फोन असा एकुण ४०,२५,०००/– रुपयांचा मुद्देमाल जप्त केला करून आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे कलम ८ (क), २२ (क),२९ एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला तसेच वर नमुद तिन्ही आरोपी यांना गुन्हयात अटक करण्यात आली होती.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण चे तपास पथक यांनी गोपनिय माहीती आणि सायबर पोलीस स्टेशन यांच्या तांत्रिक सहकार्याने सदर गुन्हयात दिनांक ०३/०६/२०२६ रोजी आरोपी क्र ४) अंकुर राजबहादुर यादव, वय ३२ वर्षे, न्यु झाशी, प्रयागराज, राज्य उत्तरप्रदेश याला शिवणी ,मध्यप्रदेश येथुन ताब्यात घेवुन अटक केले आहे. तसेच या प्रकरणातील अंमलीपदार्थ पुरवठा करणारा मुख्य आरोपी नामे पंकज सिंह नवलसिंह ठाकूर, वय ३३ वर्षे, रा. घौसिला, सेवापुरी, पोलीस स्टेशन कपसेठी, जिल्हा वाराणसी, राज्य उत्तर प्रदेश याच्याविरुद्ध दि. ०२/०६/२०२६ रोजी आसपूर देवसरा पोलीस स्टेशन, जिल्हा प्रतापगड, राज्य उत्तर प्रदेश येथे विस्फोटक पदार्थ अधिनियमाच्या कलम ४ व ५ अन्वये गुन्हा नोंद असून सदर आरोपी सध्या अटकेत आहे.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद,
## २५ लाख ०३ हजार १२० रूपयांचा मुद्देमाल जप्त
## ०२ आरोपी अटक, खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०२/०६/२०२६ रोजी खापा पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन खापा हद्दीतील मौजा खापा ते पारशिवनी रोड, जवाहर टी पॉईंट येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित काळया रंगाची स्कॉर्पिओ चार चाकी वाहन क्रमांक एम एच—१३ ई एफ—३३४४ हे वाहन मिळुन आले. नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **आरोपी नामे १) विक्रम चिरकुट वंजारी, वय ४७ वर्ष, २) विश्व दीपक विक्रम वंजारी, वय २२ वर्ष, दोन्ही राहणार भोजापुर गणपती नगर, किड्स कॉलेज जवळ, रामटेक तालुका रामटेक, जि. नागपुर यांना ताब्यात घेवुन त्यांची चौकशी केली असता सदर तंबाखु विक्री करण्यासाठी अवैधरित्या चारचाकी वाहना मध्ये प्रतिबंधीत सुगंधी तंबाखु ठेवला असल्याची माहीती प्राप्त झाली.**

पोलीसांनी पंचासमक्ष वेगवेगळया कंपनीचा १३० किलोग्रॅम सुगंधित तंबाखु एकुण किंमती १,०३,१२०/— रूपये  स्कॉर्पिओ वाहन क्रमांक एम एच १३ ई एफ ३३४४ किंमती २४,००,०००/—रूपये असा एकुण २५,०३,१२०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपींनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे खापा येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना दिनांक ०३/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आली असुन २ दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.




कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, ०८ लाख ४० हजार ६४२ रूपयांचा मूद्देमाल जप्त,२ आरोपी अटक
# स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :— दिनांक ०४/०६/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, पोलीस ठाणे कोंढाळी हद्दीमधील ग्राम दोडकी येथे पंकज जानबाजी तांदळे याने त्याचे शेतातील जनावरांच्या गोठ्यात महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी ग्राम दोडकी येथे आरोपी पंकज जानबाजी तांदळे, वय ४२ वर्षे, रा. दोडकी, ता. काटोल, जि.नागपूर याचे शेतातील जनावरांच्या गोठयावर छापा टाकुन पंचासमक्ष झडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. तसेच समोरच उभे असलेले इकोस्पोर्ट टायटॅनियम वाहन क्रमांक एम एच—१७/बी एस—०१४३ या वाहनाची झडती घेतली असता त्यात सुध्दा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. तसेच प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखु पुरवाठा करणारा आरोपी आशिक रामुजी जोगी, रा. उमरी तालुका हा सुध्दा घटनास्थळावर मिळुन आला.

**पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष १) १५१.१२ किलोग्रॅम गुटखा व प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती १,३०,६४२/— रूपये, २) इकोस्पोर्ट टायटॅनियम वाहन क्रमांक एम एच—१७/बी एस—०१४३ किंमती ७,००,०००/—रूपये ३) एक मोबाईल किंमती १०,०००/—रूपये असा एकूण किंमती ८,४०,६४२/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी १) पंकज जानबाजी तांदळे, वय ४२ वर्षे, रा. दोडकी, तालुका काटोल, जि. नागपूर २) माल पुरवठा करणारा आशिक रामुजी जोगी, वय ३३ वर्ष, रा. उमरी तालुका, सावनेर, जि. नागपूर यांचेविरूद्ध पोस्टे कोंढाळी येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना सदर गुन्हयात अटक केली आहे.**




**कारवाई करणारे पोलीस पथक जप्त मुद्देमालासह**

## ९० दिवस काम केल्याची खोटी प्रमाणपत्रे देऊन शासनाची दिशाभुल करून फसवणूक केल्या प्रकरणी ९ आरोपींना अटक

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीने (कामगाराने) बांधकाम क्षेत्रात किमान ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. यासाठी अधिकृत ठेकेदारांकडून कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येते. मात्र काही ठेकेदार व ऑनलाईन सेवा केंद्र चालक यांनी प्रत्यक्षात काम न केलेल्या व्यक्तींना खोटी व बनावट ९० दिवस काम केल्याची प्रमाणपत्रे तयार करून दिल्याचे उघडकीस आल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत दाखल अप क्रमांक ३४६/२०२६ कलम ३१८(४) आणि ३३६(३) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हयामध्ये **१) परमेश्वर गोविंदाजी देशमुख, वय ४३ वर्ष, रा. आपतूर, ता. कुही जि. नागपूर (९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र घेणारे), २) भाऊराव रामचंद्र पडोळे वय ४६ वर्षे रा. वेलतूर ता. कुही जि. नागपूर (एजंट) ३) गणेश ईश्वर मानकर वय ३० वर्ष, रा. आपतूर ता. कुही जि. नागपूर**

**(एजंट) यांना दिनांक ०३/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आले तसेच आरोपी क्रं ४) राहुल हरिदास भजनकर वय २८ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही जि. नागपूर (एजंट) याला दिनांक ०४/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.** सदर प्रकरणाचा पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत. **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत दाखल अप क्रमांक २१०/२०२६ कलम ३१८(४) आणि ३३६(३) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हयामध्ये **१) शुभम मनोहर लोणारे, वय ३० वर्ष, रा. धामणगाव, तालुका समुद्रपुर , जिल्हा वर्धा ह.मु. बेला, ता. उमरेड, जि. नागपुर ( ऑनलाईन सर्विस सेंटर चालक /मालक ) याला दिनांक ३१/०५/२०२६ रोजी अटक करण्यात आले आणि आरोपी क्रं २) सुभाष नथ्थुजी भाजीपाले, वय ४५ वर्ष, रा. बेला वॉर्ड क ०५ , ता. उमेरड, जि. नागपुर,३) विनोंद हरिश्चंद्र दालवनकर, वय ५२ वर्ष, रा. बेला वॉर्ड क ०५ , ता. उमरेड, जि. नागपुर,४) किशोर गुलाब शहाने, वय ४२ वर्ष, रा. कळमना, ता. उमरेड , जि. नागपुर, ५) गजानन अंबादास राउत, वय ३९ वर्ष, ता. उमरेड, जि. नागपुर (आरोपी क्रं २ ते ५ – ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र घेणारे) यांना दिनांक ०४/०६/२०२६ रोजी अटक करण्यात आले आहे.** सदर प्रकरणाचा पुढील तपास बेला पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन अपहृत मुलीचा घेतला शोध ,अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही येथे दिनांक ०२/०३/२०२५ रोजी अप क्र ९२/२०२५ कलम १३७(२) भा.न्या.सं अन्वये दाखल गुन्हयातील अल्पवयीन अपहृत मुलगी, वय १५ वर्षे हीचा शोध लागत नव्हता. नमुद गुन्हयातील अपहृत मुलगी हीचा शोध घेण्यासाठी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशाने सदर गुन्हयाचा तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांचे कडे वर्ग करण्यात आला. श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात श्री मिलींद तायडे, प्रभारी अधिकारी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण, पोउपनि श्री मंगेश वानखडे, मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना

कांबळे, पोलीस अंमलदार पन्नालाल बटाउवाले, पोलीस अंमलदार भाग्यश्री राउत, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा सखोल तपास केला. दिनांक ०३/०६/२०२६ रोजी नमुद गुन्हयातील अपहृत मुलीचा गोपनिय माहीतच्या आधारे शोध घेवुन परसोडी राजा, ता. कुही येथुन ताब्यात घेतले. सदर गुन्हयाचा पुढील तपास कुही पोलीस करीत आहेत.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**